# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.09.2024** **वार – बुधवार**

---

**<u>वात्सल्य सीतारामन</u>**

केंद्र सरकारच्या वित्त सेवा विभागाच्या वतीनं राबवण्यात येणाऱ्या एनपीएस वात्सल्य योजनेचा शुभारंभ अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते करण्यात आला. पुण्यातही या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण झालं. यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील उपस्थित होते. मुलांचं भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी पालकांनी एनपीएस वात्सल्य योजनेचा लाभ घ्यावा असं आवाहन पाटील यांनी केलं.

**<u>मिरवणूक-त्रास</u>**

पुणे पोलीस विघ्नहर्ता न्यासाच्या वतीनं गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान यंदाही गणेश भक्तांसाठी आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यात आली. सुसज्ज रुग्णवाहिका आणि आपत्कालीन वैद्यकीय मदत केंद्र यांच्या माध्यमातून 112 डॉक्टर, वैद्यकीय शाखेचे विद्यार्थी, परिचारक, स्वयंसेवक यांच्या माध्यमातून ही सेवा पुरविण्यात आली अशी माहिती न्यासाचे विश्वस्त डॉक्टर मिलिंद भोई यांनी दिली. या सेवेचा लाभ 582 गणेश भक्तांनी घेतला. या लोकांना खूप उन्हामुळे अति घाम येऊन अंगातील पाणी कमी झाल्यानं चक्कर येणं, गर्दीमुळं श्वास गुदमरणं, रक्तदाब वाढणं अशा तक्रारी होत्या. बऱ्याच ढोल पथकांनी रंगीत धूर सोडणारे फटाक्यांचे फवारे वापरले. त्यातून बाहेर पडणाऱ्या रंगीत धुरामुळं दमा आणि खोकला यांचं प्रमाण वाढलं. ट्रॅक्टर किंवा गाडा ट्रॉली यांच्या पत्र्यामुळे होणाऱ्या जखमा, ढोल ताशा वाजवणाऱ्या युवक युवतींना डोक्यामध्ये टिपरू लागून होणारी जखम, यावर वैद्यकीय चमूंनी उपचार केले.

**<u>कचरा</u>**

पुणे शहरात एकंदर तीन लाख 74 हजार 148 गणेश मूर्ती विसर्जित करण्यात आल्या. पुणे महापालिकेतर्फे गणेश विसर्जनासाठी बांधण्यात आलेल्या 45 हौदांमध्ये एक लाख 1 हजार 281 मूर्तींचं तर 516 लोखंडी टाक्यात एकंदर दोन लाख 82 हजार 604 मूर्तींचं विसर्जन करण्यात आलं. महापालिकेनं मूर्ती दान करण्यासाठी केलेल्या आवाहनाला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला असून 239 ठिकाणी उभारलेल्या मूर्ती संकलन केंद्रात एक लाख 76 हजार 67 मुर्ती दान करण्यात आल्या आहेत. घनकचरा विभागाचे प्रमुख आणि महापालिकेचे उपायुक्त संदीप कदम यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली.

महापालिकेने उभारलेल्या 298 निर्माल्य कलशांमध्ये एकंदर सात लाख सहा हजार 478 किलो निर्माल्य संकलन झालं आहे. मुख्य रस्त्यांवर आणि मिरवणूक मार्गांवर सुमारे चार हजार सेवकांमार्फत स्वच्छता करण्यात आली. या अभियानामध्ये 167 टन कचरा आणि साडेतीन टन चपला, बूट असा कचरा गोळा करण्यात आला.

**खरीप-उत्पादन**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामातील धान्य उत्पादन सरासरीच्या तुलनेत सुमारे 31 लाख मेट्रीक टनानं वाढण्याची अपेक्षा कृषी विभागाचे मुख्य सांख्यिक वैभव तांबे यांनी व्यक्त केली. राज्यातील खरीप हंगामातील पिकांना पावसानं दिलेली योग्य साथ आणि अनुकूल हवामानामुळं यंदाचं खरिपातील धान्योत्पादन चांगलं येण्याची आशा आहे. खरीप हंगामाचा पहिला अंदाज हाती आला असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**आरोग्य केंद्र**

पुण्यातील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयाच्या समुदाय वैद्यक विभागात आरोग्य तंत्रज्ञान मूल्यांकन साधनस्त्रोत केंद्राचं आज लेफ्टनंट जनरल दलजित सिंग यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात माहितीवर आधारित पारदर्शक आणि पुराव्यासह निर्णय घेण्यासाठी या केंद्राचा मोठा उपयोग होणार आहे. चिकित्सालयीन परिणामकारकता, कमी खर्च, सामाजिक, कायदेशीर आणि नैतिक मुद्यांच्या बाबतीत आरोग्य तंत्रज्ञान विकसित करण्यात या केंद्रातील मूल्यांकनाचा लाभ होणार आहे.

**स्वच्छता**

पिंपरी चिंचवडमधील मोठ्या रस्त्यांची स्वच्छता स्विपर यंत्राद्वारे व्यवस्थित न करता केवळ बिलं वाढवून घेणाऱ्या 11 ठेकेदारांना महापालिकेच्या आरोग्य विभागानं नोटीस बजावली आहे. दररोज जवळपास 40 किलोमीटरच्या रस्त्यांची स्वच्छता ठेकेदारांनी करणं बंधनकारक आहे. मात्र अनेक ठेकेदारांनी स्वच्छता न करता बिलं वाढवून देण्याची मागणी महापालिकेकडं केली. यापैकी एका ठेकेदाराकडून पालिकेनं 50 हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

**पाणीपुरवठा**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या क, फ, ई या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील पाणीपुरवठा उद्या 19 सप्टेंबरला संध्याकाळी बंद राहणार आहे.20 सप्टेंबरचा पाणी पुरवठा अपुरा आणि कमी दाबानं होणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे शहर सह अभियंता अजय सूर्यवंशी यांनी दिली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या चिखली जलशुद्धीकरण केंद्र आणि तळवडे नदीजल उपसा केंद्र या ठिकाणी विद्युत पुरवठा करणाऱ्या भोसरी उप-केंद्रात दुरुस्तीचं काम करण्यात येणार असल्यानं 19 सप्टेंबर रोजीचा वीजपुरवठा सकाळी दहा ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत बंद राहणार आहे. तरी सर्व

नागरिकांनी महापालिकेला सहकार्य करावं, असं आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं सुरु असलेल्या स्पोटर्सफिल्ड मान्सुन लीग' अजिंक्यपद 14 वर्षाखालील 30 षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत विराग ॲकॅडमीनं गॅरी कर्स्टन क्रिकेट ॲकॅडमीचा 1 गडी राखून पराभव केला. अन्य सामन्यात धीरज जाधव क्रिकेट ॲकॅडमीने विराग ॲकॅडमीचा 81 धावांनी पराभव केला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज चांगलं उन्हं पडलं होतं. उद्याही असंच हवामान राहून कमाल तापमान 30 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**